MHAH170036892016

**न्यायनिर्णय**
(दिनांक २५ मे, २०२६)

सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. नागरे व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. पी डी. बेंद्रे यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोगपक्षाच्या खटल्यातील कथनांवरुन खालील मुद्दे काढण्यात आले व त्याचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| **१.** आरोपीने दिनांक ०५/०८/२०१६ रोजी सकाळी १०:३० वाजताचे सुमारास मौजे लोणी बु., संगमनेर - लोणी रोड, ता. राहाता येथे आरोपीच्या ताब्यातील इंडिका कार क्रमांक एम.एच-०४-सी.जे.-६४३४ ही एखादया व्यक्तीच्या जीवास धोका होईल किंवा दुस-या कोणा व्यक्तीस दुखापत किंवा नुकसान बहुतकरून होईल अशारितीने अविचाराने, हयगईने, अविचाराने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविली आणि अशा प्रकारे भारतीय दंड संहिता कलम २७९ अंतर्गत गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | **: नाही** |
| **२.** उपरोक्त दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील उपरोक्त वर नमूद इंडिका कार क्रमांक एम.एच-०४-सी.जे.-६४३४ वेगात चालवून हयगईने, अविचाराने चालवुन अहमद चौगुले व समीर बेग यांची मोटारसायकल क्रमांक एम.एच.-१७-एफ-१५३४ ला जोरात धडक देऊन त्यांना गंभीर जखमी करुन त्यांचे गंभीर दुखापतीस कारणीभूत झालात व त्याव्दारे तुम्ही भारतीय दंड विधान कलम | **: नाही** |

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| ३३७ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | |
| **३.** उपरोक्त दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील उपरोक्त वर नमूद इंडिका कार क्रमांक एम.एच-०४-सी.जे.-६४३४ ही निष्काळजीने किंवा बेदरकारपणे चालवून समीर बेग यांच्या मोटारसायकल क्रमांक मोटारसायकल क्रमांक एम.एच.-१७-एफ-१५३४ ला धडक देऊन अहमद चौगुले व समीर बेग यांना गंभीर दुखापतीस कारणीभूत झालात व त्याव्दारे तुम्ही भारतीय दंड विधान कलम ३३८ प्रमाणे गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | **: नाही** |
| **४.** उपरोक्त दिवशी वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमूद इंडिका कार क्रमांक एम.एच-०४-सी.जे.-६४३४ अतिवेगाने रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन चालविली आणि त्याद्वारे मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा केला आहे, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | **: नाही** |
| **५.** उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वर नमूद मोटारसायकल क्रमांक एमएच-१७-एफ-१५३४ चा अपघात करुन पोलीस स्टेशनला अपघाताची खबर दिली नाही व जखमीला स्थानिक रुग्णालयात दाखल न करता निघून गेलात व त्याव्दारे तुम्ही मोटार वाहन कायदा कलम १३४ (अ)(ब) अंतर्गत गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | **: नाही** |
| **६.** आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>पटलावरील पुरावा</u>

**०२.** आरोपीवरील आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने पंच - साक्षीदार क्र. १ जिशानम हसुमे शेख, साक्षीदार क्र.२ इमदाद अहमद चौगुले, फिर्यादी - साक्षीदार क्र.३ समीर वजीर बेग, साक्षीदार क्र.४ अहमद बाबुभाई चौगुले, वैद्यकिय अधिकारी - साक्षीदार क्र.५ अक्षय धनराज पाटील, साक्षीदार क्र.६ वजीर इब्राहीम बेग, साक्षीदार क्र.७ असरफ अली अहमद, घटनास्थळ पंच - साक्षीदार क्र.८ शाहरूख आयूब पठाण, जप्ती पंच - साक्षीदार क्र.९ नुरमोहम्मद बाबूलाल इनामदार व साक्षीदार क्र.१० सोमनाथ भगवान जायभाये यांची साक्ष नोंदविली आहे. तसेच कागदोपत्री पुराव्यामध्ये, घटनास्थळ पंचनामा नि.क्र.२१, फिर्याद नि.क्र. ३०, पत्र नि.क्र. ४५, वैद्यकिय प्रमाणपत्र नि.क्र. ४६ व ४७, पंचनामा नि.क्र. ५५, बंधनपत्र नि.क्र. ६५ व ६६, पत्र नि.क्र. ६७, अटक पंचनामा नि.क्र.६८ वर भिस्त ठेवली आहे.

**०३.** जबाबमध्ये आरोपीने पुरावा सादर केला नसला तरी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये नोंदविलेल्या निवेदन निशााणी क्रमांक ३८ द्वारे आरोपीने सादर पुरावा नाकारला आहे.

## <u>कारणमिमांसा</u>

**०४.** या प्रकरणातील आरोपांवरून अभियोग पक्षातर्फे एकूण १० साक्षीदार तपासण्यात आले आहेत. तपासलेल्या साक्षीदारांमध्ये फिर्यादी साक्षीदार क्रमांक ३, समीर वजीर बेग, यांनी त्यांची साक्ष नोंदवली आहे.

**०५.** त्यांच्या कथनानुसार, ही घटना दिनांक ०५/०८/२०१६ रोजी सकाळी ०९:३० वाजेच्या सुमारास चंद्रपूर येथे घडली. बिल्डिंगचे मटेरियल पाहण्यासाठी ते गेले होते. ते जाताना बजाज कंपनीच्या दुचाकी वाहन क्रमांक एम.एच.-१७ ए.एफ.-१५३६ वरून गेले होते. संगमनेरवरून लोणीकडे येणाऱ्या रस्त्यावर, इंजिनिअरिंग कॉलेजसमोरून जात असताना पाठीमागून इंडिका कंपनीचे एक चारचाकी वाहन भरधाव वेगात आले आणि त्यांनी त्यांच्या दुचाकी वाहनाला धडक दिली. या धडकेमुळे फिर्यादी रस्त्याच्या बाजूला पडले, तर अहमद चौगुले हे रस्त्यावर पडले.

**०६.** या अपघातात अहमद चौगुले यांच्या डाव्या पायाला, उजव्या पायाला व पाठीला मार लागला होता. त्यात दुचाकी वाहनाचे देखील नुकसान झाले होते. अपघात झाला त्या दिवशी अहमद चौगुले हे वाहन चालवीत होते व फिर्यादी त्यांच्या पाठीमागे बसले होते.

**०७.** त्यांनी पुढे असे देखील कथन केले की, चारचाकी वाहनाचा क्रमांक इंडिका एम.एच-०४-सी.जे-६४३४ असा होता. त्यावेळी तिथे लोक जमा झाले व लोकांनी ॲम्बुलन्स बोलावून त्यांना उपचारासाठी हॉस्पिटल येथे पाठवले. अहमद चौगुले यांना जास्त मार लागलेला होता. सदरचा अपघात हा इंडिका कार चालकाच्या चुकीमुळे झाला होता. याबाबत त्यांनी दिनांक ०७/०८/२०१६ रोजी फिर्याद दिली. सदरची फिर्याद निशाणी क्रमांक ३० वर दाखल आहे. उपचारासाठी रुग्णालयात दाखल

असल्याने त्यांना फिर्याद देण्यास उशीर झाला. त्यांना इंडिका चालकाची ओळख पटली असून, त्यांनी आरोपीला न्यायालयात ओळखले आहे.

**०८.** साक्षीदार क्रमांक ३ यांचा पुरावा पाहता, त्यांनी घटनेची वेळ तसेच वाहनांचा क्रमांक आणि अपघाताची परिस्थिती स्पष्टपणे कथन केली आहे. त्यांनी आरोपीला न्यायालयात समक्ष ओळखले देखील आहे. परंतु असे असले तरी, सदर घटना दिनांक ०५/०८/२०१६ रोजी घडली असताना देखील, फिर्याद दिनांक ०७/०८/२०१६ रोजी दिल्याचे दिसून येते.

**०९.** या विलंबाबाबत विचारणा केली असता, उपचारासाठी रुग्णालयात दाखल होतो, म्हणून फिर्याद देण्यास उशीर झाल्याचे फिर्यादीने कथन केले आहे. परंतु त्यांचा उलटतपास पाहता, त्यांनी स्पष्टपणे मान्य केले आहे की, त्यांना स्वतःला केवळ किरकोळ मार लागला होता, जास्त मार लागलेला नव्हता. या बाबीत साक्षीदाराचा वैद्यकीय पुरावा पाहता, त्यामध्ये असे स्पष्टपणे दिसून येते की, फिर्यादीला त्याच दिवशी दुपारी ०४:३० वाजेच्या सुमारास उपचार देऊन दवाखान्यातून सोडण्यात आले होते.

**१०.** यावरून, फिर्यादीस घटनेच्या दिवशीच दवाखान्यातून ०४:३० वाजेच्या सुमारास सोडण्यात आले असताना देखील, त्यांनी फिर्याद त्या दिवशी न देता, तब्बल तिसऱ्या दिवशी दिली. यावरून फिर्यादी उपचारासाठी रुग्णालयात दाखल असल्याबाबत सांगत असलेले कारण उलटतपासातून कथन झालेली माहिती, एकमेकांशी विसंगत असल्याचे दिसून येते.

**११.** फिर्यादीने वाहनाचा क्रमांक आणि आरोपीची ओळख स्पष्टपणे सांगितली आहे. 'फिर्यादी आरोपीची ओळख कशा आधारे सांगत आहे?' याबाबत उलटतपासणी दरम्यान विचारणा झाली असता, अपघातानंतर आरोपी गाडी सोडून रस्त्यावर उभा असल्याचे त्यांनी सांगितले आहे. परंतु याच साक्षीदाराचा उलटतपास पुढे पाहता, फिर्यादी तिथेच स्पष्टपणे असेही सांगत आहेत की, वाहन चालक अपघातानंतर लगेच तिथून पळून गेला होता. याबाबत फिर्यादीचे मूळ फिर्यादीमधील कथन पाहिले असता, फिर्यादीने तिथे स्पष्टपणे कथन केले होते की, इंडिका कार चालक तिथून पळून गेला व त्याचे नाव समजले नाही. त्यामुळे फिर्यादीच्या कथनातील या दोन्ही बाबी एकमेकांशी विसंगत ठरत आहेत.

**१२.** फिर्यादीचा उलटतपासामध्ये, त्यांनी स्पष्टपणे मान्य केले की, त्यांना आरोपीचे नाव फिर्याद देते दिवशी माहिती झाले होते. परंतु असे असताना देखील, फिर्यादीने मूळ फिर्यादीमध्ये आरोपीचे नाव नमूद केल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबी फिर्यादीच्या साक्षीवर आणि आरोपीच्या ओळखीवर संशय निर्माण करतात.

**१३.** फिर्यादीच्या कथनातून अपघाताची परिस्थिती पाहिली असता, फिर्यादीने अपघातावेळी त्यांच्या वाहनाला पाठीमागून इंडिका कारने धडक दिल्याचे सांगितले आहे. परंतु त्यांची दुचाकी रस्त्याच्या नेमक्या कोणत्या बाजूने जात होती आणि मागील वाहन कोणत्या बाजूने आले, हे त्यांच्या कथनातून स्पष्ट होत नाही. दुसरे वाहन पाठीमागून

येऊन त्यांना धडक देते, या परिस्थितीवरून मागे येणाऱ्या वाहनाने कशा प्रकारे आणि किती निष्काळजीपणे वाहन चालवले, याबाबत स्पष्टता येत नाही.

**१४.** या सर्व परिस्थितीमुळे अपघाताबाबत आणि आरोपीच्या प्रत्यक्ष ओळखीबाबत संशय निर्माण होतो. करिता, फिर्यादीच्या पुराव्यातून आरोपीवरील गुन्हा निश्चितपणे सिद्ध होत नसल्यामुळे फिर्यादीच्या पुराव्यास दुजोरा देणारा पुरावा पटलावर आला आहे का, हे पाहणे उचित ठरेल.

**१५.** अभियोग पक्षाने साक्षीदार क्रमांक ४, अहमद बाबूभाई चौगुले यांनी त्यांची साक्ष निशाणी क्रमांक ३२ द्वारे कथन केले की, सन २०१६ मध्ये त्यांनी समीर वजीर बेग यांना बिल्डिंगच्या गवंडी कामासाठी ठेवले होते. दिनांक ०५/०८/२०१६ रोजी सकाळी ०९:३० वाजेच्या सुमारास, ते स्वतः बजाज कंपनीची दुचाकी क्रमांक एम.एच-१७-ए.एफ-१५३४ चालवत जात होते व समीर बेग हे त्यांच्या पाठीमागे बसले होते. ते संगमनेरकडून लोणीकडे जाणाऱ्या रस्त्याने इंजिनिअरिंग कॉलेजसमोर आले असता, पाठीमागून इंडिका कंपनीचे एक चारचाकी वाहन भरधाव वेगात आले आणि त्या वाहनाने सदर साक्षीदार चालवत असलेल्या दुचाकीस डाव्या बाजूने धडक दिली. या घटनेत समीर बेग हे रस्त्याच्या बाजूला फेकले गेले, तर साक्षीदार स्वतः रस्त्यावर पडले. या अपघातामुळे साक्षीदाराच्या डाव्या पायाला फ्रॅक्चर झाले व डोक्याला मार लागला. तसेच पाठीमागे बसलेल्या समीर बेग यांच्या उजव्या पायाला व पाठीला मार लागला.

**१६.** सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, इंडिका कंपनीच्या त्या चारचाकी वाहनाचा रंग पांढरा होता व तिचा क्रमांक एम.एच-०४-सी.जे-६४३४ असा होता. अपघातानंतर तो चारचाकी वाहन चालक थोडा वेळ रस्त्यावर त्यांच्या जवळ येऊन थांबला आणि नंतर तेथून पळून गेला.

**१७.** घटनेच्या वेळी तिथे लोक जमा झाले होते. जमलेल्या लोकांनी ॲम्बुलन्स बोलावून त्यांना उपचारासाठी पीएमटी हॉस्पिटल, लोणी येथे पाठवले. त्यांना जास्त मार लागल्यामुळे तिथे प्राथमिक उपचार करून, पुढील उपचारांसाठी त्यांना सुयोग हॉस्पिटल, नाशिक येथे नेण्यात आले. तेथे त्यांच्यावर २२ दिवस उपचार झाले आणि त्यानंतर त्यांचा डावा पाय मांडीतून कापावा लागला.

**१८.** सदरचा अपघात हा चारचाकी वाहन चालकाच्या चुकीमुळे झाला होता. म्हणून त्या घटनेची फिर्याद समीर बेग यांनी नोंदवली होती. ते चारचाकी वाहन तुषार विशाल खर्डे हा चालवत होता. साक्षीदाराने आरोपीला न्यायालयात ओळखले आहे, कारण अपघातानंतर तो थोडा वेळ त्यांच्या जवळ थांबला होता व नंतर निघून गेला होता.

**१९.** सदर साक्षीदाराचा पुरावा पाहता, त्यांनी घटनेची तारीख, अपघातग्रस्त दोन्ही वाहनांचे क्रमांक आणि आरोपीचे नाव हे अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणेच स्पष्टपणे कथन केले आहे. त्यामुळे त्यांची साक्ष अभियोग पक्षाला पूरकच ठरत आहे. परंतु, सदर साक्षीदाराचा उलटतपास पाहता, त्यांनी असे मान्य केले आहे की, आरोपीचे नाव त्यांना पोलिसांकडून समजले होते. यावरून हे स्पष्ट होते की, आरोपीच्या नावाबाबत सदर

साक्षीदार केवळ ऐकीव माहितीच्या आधारे कथन करत आहे. ते नाव नेमके कोणत्या पोलीस अधिकाऱ्याकडून आणि कधी समजले, याबाबत साक्षीदाराने आपल्या पुराव्यातून कोणतीही बाब स्पष्ट केलेली नाही.

**२०.** सदर साक्षीदाराने अपघातानंतर आरोपी तिथे थांबला होता असे कथन केले आहे. परंतु, मूळ फिर्यादीमधील कथन पाहिले असता, अपघातानंतर वाहन चालक वाहन तिथेच सोडून निघून गेल्याचे नमूद आहे. यावरून साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या मूळ कथनात सुधारणा करून न्यायालयासमक्ष साक्ष दिल्याचे दिसून येते.

**२१.** तसेच, सदर साक्षीदाराने अपघात करणाऱ्या वाहनाचा क्रमांक एम.एच-०४-सी.जे-६४३४ असा अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणेच न्यायालयात सांगितला आहे. परंतु, ही बाब त्यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात अथवा दवाखान्यात दिलेल्या माहितीमध्ये कुठेही नमूद नसल्याचे आरोपीतर्फे समोर आणले आहे.

**२२.** अपघाताच्या घटनेबाबत त्यांनी केलेले वर्णन पाहिले असता, त्यांनी एम.एच ०४ सी.जे ६४३४ या क्रमांकाच्या कार चालकाने पाठीमागून येऊन धडक दिल्याचे सांगितले आहे. परंतु त्यांच्या पुराव्यातून हे स्पष्ट होत नाही की, त्यांचे स्वतःचे दुचाकी वाहन रस्त्याच्या कोणत्या बाजूने चालले होते आणि पाठीमागून येणारे चारचाकी वाहन कोणत्या बाजूने आले होते. तसेच, धडक देणाऱ्या वाहनाच्या चालकाने ते वाहन किती वेगात आणि निष्काळजीपणे चालवले होते आणि या अपघातात केवळ पाठीमागून

येणाऱ्या वाहनाचीच चूक होती, हे सिद्ध करणारी कोणतीही ठोस माहिती या साक्षीदाराच्या पुराव्यातून समोर आलेली नाही.

**२३.** एकंदरीतच, सदर साक्षीदाराने वाहन चालकाचे नाव आणि वाहनाचा क्रमांक न्यायालयात कथन केला असला तरी, ती माहिती त्यांना इतर व्यक्तींकडून (पोलिसांकडून) मिळाल्याचे निष्पन्न होते. तसेच, त्यांनी घटनेनंतर पोलिसांना दिलेल्या मूळ जबाबात या माहितीची नोंद नसल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांची साक्ष आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी सक्षम ठरत नाही. करिता, घटनेच्या वेळी सदर नमूद वाहन आरोपीच्याच ताब्यात होते का आणि आरोपीच ते वाहन चालवत होता का, याबाबत इतर काही अधिक माहिती आणि पुरावे न्यायालयाच्या पटलावर आले आहेत का, हे पाहणे उचित ठरेल.

**२४.** अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्रमांक ६, वजीर इब्राहिम बेग यांनी आपली साक्ष निशाणी क्रमांक ४८ द्वारे नोंदवली आहे. त्यांनी कथन केले आहे की, समीर बेग हा त्यांचा मुलगा असून, सन २०१६ मध्ये तो बांधकामाचे काम करत होता. घटनेच्या दिवशी सकाळी ११:०० वाजेच्या दरम्यान, संगमनेर रस्त्यावरील आयटीआय, कॉलेजजवळ ही घटना घडली. या घटनेबाबत त्यांना त्यांच्या मुलाकडून समजले. त्यानंतर ते पीएमटी, रुग्णालयात गेले. तिथे त्यांनी पाहिले की, त्यांच्या मुलाच्या उजव्या पायाला व कमरेला मार लागला होता, तर अहमद चौगुले यांचा डावा पाय फ्रॅक्चर झाला होता.

**२५.** त्यावेळी त्यांचा मुलगा आणि अहमद चौगुले, हे एका दुचाकीवर होते आणि ते बांधकामाचे सामान आणण्यासाठी गेले होते. लोणीकडून परत येत असताना मागून एका चारचाकी वाहनाने त्यांना धडक दिली. त्या गाडीचा क्रमांक एमएच ०४ - ६४३४ असा होता आणि त्या कार चालकाचे नाव तुषार खर्डे असल्याचे त्यांना समजले.

**२६.** सदर साक्षीदाराचा पुरावा पाहता, त्यांनीही अभियोग पक्षाला पूरक अशीच साक्ष दिली आहे. परंतु, सरतपासणीमध्ये त्यांनी हे स्पष्टपणे मान्य केले आहे की, या घटनेबाबत त्यांना त्यांच्या मुलाकडून समजले होते. उलटतपासणीमध्ये त्यांनी हे देखील स्पष्ट केले की, सदर घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली नव्हती. त्यामुळे ही घटना कोणाच्या चुकीमुळे घडली, हे ते सांगू शकत नाहीत. त्यांनी घटनेबद्दल दिलेली माहिती, जसे की मागून धडक दिल्याने अपघात घडला, आरोपी चालवत असलेल्या कथित वाहनाचा क्रमांक आणि आरोपीची ओळख, या सर्व बाबी त्यांनी केवळ ऐकीव माहितीच्या आधारेच कथन केल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत, त्यांचा हा पुरावा केवळ 'ऐकीव पुरावा' म्हणूनच विचारात घ्यावा लागेल.

**२७.** त्यांच्या पुराव्यावरून फक्त एवढेच निष्पन्न होते की, घटनेनंतर काही वेळाने त्यांनी फिर्यादी आणि दुसरा जखमी साक्षीदार यांच्या शरीरावरील दुखापती प्रत्यक्ष पाहिल्या होत्या. इथपर्यंतच त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेली माहिती कथन केली आहे. त्यामुळे, केवळ एक परिस्थितीजन्य पुरावा म्हणून ती माहिती निश्चितच अभियोग पक्षाला पूरक ठरत आहे.

**२८.** अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्रमांक ७, असरफ अली अहमद यांनी आपली साक्ष निशाणी क्रमांक ४९ द्वारे नोंदवली आहे. त्यांनी कथन केले की, जखमी अहमदभाई हे त्यांचे वडील आहेत आणि त्यांनी समीर बेग याला त्यांच्या घराचे कॉन्ट्रॅक्ट दिले होते. ही घटना सन २०१६ मध्ये सकाळी १०:३० ते ११:०० वाजेच्या सुमारास घडली. त्या दिवशी ते स्वतः ड्युटीवर गेले होते. घटनेबाबत त्यांना समीर बेग यांचा फोन आल्यानंतर समजले.

**२९.** त्यांनी पुढे असेही कथन केले की, घराचे सामान आणण्यासाठी गेल्यानंतर, ते परत येत असताना लोणीकडे एका इंडिका कारने पाठीमागून त्यांच्या वाहनाला धडक दिली. घटनेच्या वेळी त्यांचे वडील 'बजाज फोरेक्स चॅम्पियन' या दुचाकीवरून समीरसोबत येत होते. ते वाहन त्यांचे वडील चालवत होते, तर समीर त्यांच्या पाठीमागे बसला होता.

**३०.** अपघातानंतर समीर रस्त्याच्या बाजूला पडला आणि त्यांचे वडील रस्त्यावर पडले. त्यांच्या वडिलांच्या डाव्या पायाला गंभीर जखम झाली होती आणि डोक्यालाही मार लागला होता. मोटरसायकलचे पाठीमागून मोठे नुकसान झाले होते. समीरच्या उजव्या पायाला आणि पाठीला दुखापत झाली होती. सुरुवातीला त्या दोघांना रुग्णवाहिकेतून पीएमटी, रुग्णालयात नेण्यात आले व नंतर त्यांच्या वडिलांना नाशिकला नेण्यात आले. धडक दिलेल्या गाडीचा क्रमांक एमएच ०४ सीजे ६४३४ असल्याचेही

सदर साक्षीदाराने सांगितले आहे आणि कार चालकाचे नाव तुषार विलास खरडे असल्याचे त्यांना पोलिसांकडून समजल्याचेही ते सांगत आहेत.

**३१.** असे असले तरी, आपण आरोपीला स्वतः पाहिले असल्याचे साक्षीदार स्पष्टपणे अमान्य करत आहेत (म्हणजेच त्यांनी आरोपीला प्रत्यक्ष पाहिले नाही). यावरून, सदर साक्षीदार देखील केवळ ऐकीव माहितीच्या आधारेच घटनेबाबत सांगत असल्याचे दिसून येते. त्यांचा उलटतपास पाहता, ते अपघातानंतर थेट दवाखान्यातच गेले होते, ते घटनास्थळी हजर असल्याचे कुठेही दिसून येत नाही.

**३२.** साक्षीदार क्रमांक ६ आणि ७ यांनी घटनेनंतर जखमींना पाहिले असले आणि त्या आधारे त्यांनी जखमींच्या दुखापतींबाबत परिस्थितीजन्य माहिती न्यायालयासमोर आणली असली तरी, ते या घटनेचे अथवा घटनेच्या वेळी आरोपीच्या/वाहन चालकाच्या चुकीबाबतचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. त्यामुळे, त्याबाबत त्यांची साक्ष अभियोग पक्षाला पूरक ठरत नाही. ही माहिती केवळ एक परिस्थितीजन्य पुरावा म्हणूनच विचारात घ्यावी लागेल.

**३३.** अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्रमांक ८, शाहरुख अयुब पठाण यांनी आपली साक्ष निशाणी क्रमांक ५३ द्वारे नोंदवली आहे. त्यांनी कथन केले की, गुन्हा क्रमांक ११०/२०१६ च्या कामी, पोलीस अंमलदार जायभाये यांनी त्यांना घटनास्थळी पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. त्यांच्या व जिशान हुसेन शेख यांच्या समक्ष दिनांक ०७/०८/२०१६ रोजी त्यांना बोलावून हा पंचनामा करण्यात आला. लोणी-संगमनेर

रस्त्यावर, अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळ पूर्व-पश्चिम दिशेला हे घटनास्थळ होते आणि ते घटनास्थळ स्वतः फिर्यादी समीर याने त्यांना दाखवले.

**३४.** फिर्यादीसोबत पोलीस अंमलदार जायभाये हे देखील उपस्थित होते. त्यांनी घटनास्थळाच्या आजूबाजूची घरे दाखवली; त्यानुसार घटनास्थळाच्या उत्तरेला चंद्रकांत आणि दक्षिणेला सोपान यांची जागा आहे, तर पूर्व-पश्चिम लोणी-संगमनेर रस्ता आहे. त्यावेळी रस्त्याला ५ x ५ फुटाची साईडपट्टी होती आणि रस्त्याची एकूण रुंदी ३५ फूट होती. घटनेबाबत स्वतः फिर्यादीने माहिती दिली आणि घटनास्थळ पंचनामा संध्याकाळी ०५:०० ते ०६:०० च्या दरम्यान करण्यात आला. सदर घटनास्थळ पंचनामा निशाणी क्रमांक २१ असल्याचेही साक्षीदाराने स्पष्टपणे कथन केले आहे.

**३५.** सदर साक्षीदाराचा उलटतपास पाहता, त्यांनी हे स्पष्टपणे मान्य केले आहे की, फिर्यादीनेच त्यांना बोलावले होते आणि फिर्यादी हा त्यांचा मित्र व नातेवाईक आहे. यावरून सदर साक्षीदार हा फिर्यादीशी हितसंबंध ठेवणारी व्यक्ती असल्याचे दिसून येते. पुढे, सदर साक्षीदार पंचनाम्यासाठी आपण घटनेच्या दिवशीच गेल्याचे सांगत आहेत. परंतु, घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्रमांक २१) पाहता, त्यामध्ये पंचनाम्याची कार्यवाही दिनांक ०७/०८/२०१६ रोजी झाल्याचे दिसून येते. अभियोग पक्षाच्या कथनानुसार, ही घटना दिनांक ०७/०८/२०१६ ऐवजी दिनांक ०५/०८/२०१६ रोजी घडली होती. साक्षीदार मात्र घटनेच्या दिवशीच घटनास्थळी गेल्याचे सांगत आहेत.

यावरून घटनास्थळ पंचनाम्याची कार्यवाही खरोखरच त्यांच्या समक्ष झाली होती का, याबाबत शंका निर्माण होते.

**३६.** एका क्षणासाठी सदर साक्षीदाराच्या पुराव्यातून घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्रमांक २१) सिद्ध झाला आहे असे ग्राह्य धरून तो पंचनामा पुराव्यात वाचला असता, त्यामध्ये दिनांक '०८/०७/२०१६' रोजी १७:०० ते १७:४५ वाजेच्या दरम्यान घटनास्थळ पंचनाम्याची कार्यवाही झाल्याचे दिसून येते. पंचांना फिर्यादी समीर वजीर बेग याने घटनास्थळ दाखवले असून, ते घटनास्थळ लोणी-संगमनेर रस्त्यावरील चांगदेव जगताप यांच्या बंगल्यासमोरील रस्त्याच्या कडेची जागा असल्याचे दिसून येते. परंतु, पंचनाम्याच्या वेळी पंचांना त्या ठिकाणी वाहनाचे ब्रेक लागल्याचे कोणतेही निशाण अथवा अपघाताची कोणतीही वस्तू मिळून आल्याचे दिसून येत नाही.

**३७.** त्यामुळे, या घटनास्थळ पंचनाम्याच्या आधारे फक्त घटनास्थळाचे वर्णनच न्यायालयासमोर आले आहे. याव्यतिरिक्त, आरोपीने त्या ठिकाणी त्याच्या ताब्यातील एखादे वाहन किंवा अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे नमूद केलेले वाहन निष्काळजीपणे चालवले होते, ही बाब समोर आणणारी कोणतीही माहिती घटनास्थळ पंचनाम्यातून समोर आल्याचे दिसून येत नाही.

**३८.** अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्रमांक १, जिशान हुसेन शेख यांनी आपली साक्ष निशाणी क्रमांक २० द्वारे नोंदवली आहे. त्यांनी सांगितले की, दिनांक ०७/०८/२०१६ रोजी लोणी-संगमनेर रस्त्यावर ज्या ठिकाणी अपघात घडला, त्या

ठिकाणी त्यांना बोलावण्यात आले होते. ते ठिकाण इंजिनिअरिंग कॉलेजजवळ असल्याचे, त्यांच्यासोबत शाहरुख पठाण हे देखील हजर असल्याचे आणि हे घटनास्थळ समीर बेग याने दाखवल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, त्या ठिकाणी पोलीस अंमलदार जायभाये यांनी घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्रमांक २१) तयार केल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**३९.** सदर साक्षीदाराच्या पुराव्यातून देखील फक्त घटनास्थळ पंचनामाच सिद्ध झाला आहे. घटनेबाबत त्यांच्या पुराव्यातून कोणतीही अधिकची माहिती समोर आलेली नाही. मी यापूर्वीच साक्षीदार क्रमांक ८ यांच्या पुराव्याचे विश्लेषण करताना, घटनास्थळ पंचनामा सिद्ध झाल्याचे ग्राह्य धरून त्याद्वारे फक्त घटनास्थळाचे वर्णनच न्यायालयासमक्ष आल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे, साक्षीदार क्रमांक १ यांची साक्ष देखील केवळ त्या पंचनाम्याला दुजोरा देण्यापुरतीच मर्यादित ठरत आहे; त्याव्यतिरिक्त कोणतीही अधिकची माहिती यातून समोर येत नाही.

**४०.** अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्रमांक २, इमदाद अहमद चौगुले यांनी आपली साक्ष निशाणी क्रमांक २२ द्वारे नोंदवली आहे. त्यांनी कथन केले की, सन २०१६ मध्ये त्यांनी त्यांच्या बंगल्यावर कॉन्ट्रॅक्टर म्हणून समीर बेग यांना काम दिले होते. सदर बंगल्याचे बांधकाम चालू असताना, दिनांक ०५/०८/२०१६ रोजी सकाळी कॉन्ट्रॅक्टर समीर बेग आणि त्यांचे (साक्षीदाराचे) वडील अहमद चौगुले हे संगमनेरवरून 'लोणी खुर्द'ला येत असताना हा अपघात घडला.

**४१.** त्यावेळी ते अपघातग्रस्त वाहन त्यांचे वडील चालवत होते आणि इंडिका वाहन क्रमांक एमएच ०४ - ६४३४ द्वारे त्यांना पाठीमागून धडक देण्यात आली होती. त्या अपघातामध्ये त्यांच्या वडिलांच्या डाव्या पायाला व घोट्याला मार लागला. त्यांना या घटनेबाबतची माहिती समीर बेग यांच्याकडून समजली. तो अपघात इंडिका कार चालकाच्या चुकीमुळे घडला आणि त्या घटनेची फिर्याद समीर बेग याने दिली होती. त्या चालकाचे नाव तुषार खरडे असल्याचे त्यांना नंतर समजले.

**४२.** सदर साक्षीदाराचा उलटतपास पाहता, त्यांना घटनेबाबतची माहिती १११० मिनिटांनी मिळाल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच, त्यांनी स्वतः अपघात पाहिलेला नसून अपघात नेमका कसा घडला हे ते सांगू शकणार नाहीत. अशा परिस्थितीत, ते देखील या अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार ठरत नाहीत. त्यांनी कथन केलेली माहिती त्यांना इतर व्यक्तींद्वारे समजल्याचे यावरून स्पष्ट दिसून येते. त्यांनी जरी आरोपीचे नाव सांगितले असले तरी, ती माहिती त्यांनी इतर व्यक्तींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारेच कथन केली आहे. त्यांच्या उलटतपासणीमध्ये, दिनांक ७ तारखेला पोलिसांना जबाब देतेवेळी त्यांनी आरोपीचे नाव सांगितले नव्हते, ही बाब समोर आली आहे.

**४३.** अशा परिस्थितीत, त्यांना आरोपीचे नाव प्रथमतः कोणामार्फत समजले, ही माहिती त्यांनी न्यायालयासमोर सांगणे अपेक्षित होते. परंतु, त्याबाबत सदर साक्षीदार कुठेही स्पष्टीकरण देत असल्याचे दिसून येत नाही. आरोपीच्या चुकीमुळे अपघात

झाल्याचे साक्षीदार सांगत असले तरी, ही माहिती केवळ 'ऐकीव माहिती' म्हणूनच विचारात घ्यावी लागेल.

**४४.** अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्रमांक ९, नूर मोहम्मद बाबूलाल इनामदार यांनी आपली साक्ष निशाणी क्रमांक ५४ द्वारे नोंदवली आहे. त्यांनी कथन केले की, लोणी पोलीस ठाण्याचे अंमलदार जायभाये यांनी दिनांक १०/०८/२०१६ रोजी त्यांना बोलावले होते. गाड्यांचा अपघात झाला होता, आणि त्या वाहनांचा पंचनामा करण्यासाठी त्यांना बोलावण्यात आले होते. तेथे इंडिका आणि मोटरसायकल अशी दोन वाहने होती. इंडिका गाडीचा क्रमांक एमएच ०४ सीजे ६४३४ असा होता, तर मोटरसायकलचा क्रमांक एमएच १७ एएफ १५३४ असा होता. इंडिका गाडीचे पुढून डाव्या बाजूला नुकसान झाले होते आणि मोटरसायकलला पाठीमागून धडक बसली होती. त्यावेळी पोलीस ठाण्यात आणखी एक इसम देखील हजर होता आणि त्यांच्या समक्ष जप्ती पंचनामा (निशाणी क्रमांक ५५) तयार करण्यात आला. त्यांनी इंडिका गाडीचे छायाचित्र देखील ओळखले.

**४५.** सदर साक्षीदाराचा उलटतपास पाहता, त्यांना उलटतपासणीमध्ये ज्या वाहनांचा जप्ती पंचनामा करण्यात आला, त्या वाहनांचे क्रमांक सांगता आले नाहीत; जे त्यांनी सरतपासणीमध्ये स्पष्टपणे कथन केल्याचे दिसून येते. जप्ती पंचनाम्याच्या कार्यवाहीबाबत त्यांनी दिलेली मुख्य साक्ष दिनांक २७/०९/२०२३ रोजी झाल्यानंतर, त्यांची उलटतपासणी दिनांक २२/०९/२०२५ रोजी, म्हणजेच तब्बल जवळपास दोन

वर्षांनंतर नोंदवण्यात आली. इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर त्यांना ती माहिती विस्मरण होण्याची शक्यता विचारात घेता, उलटतपासणीमध्ये त्यांना वाहनांचा क्रमांक न सांगता येणे, ही बाब निश्चितच त्यांच्या सरतपासणीमधील माहिती नाकारण्यास पुरेशी ठरत नाही.

**४६.** याव्यतिरिक्त त्यांचा घेतलेला उलटतपास पाहता, त्यांनी सरतपासणीत कथन केलेली माहिती नाकारण्यास कोणतेही सबळ कारण न्यायालयाच्या पटलावर आल्याचे दिसून येत नाही. करिता, सदर साक्षीदाराच्या पुराव्याच्या आधारे जप्ती पंचनामा (निशाणी क्रमांक ५५) सिद्ध झाल्याने तो पुराव्यात वाचणे क्रमप्राप्त ठरते.

**४७.** जप्ती पंचनामा (निशाणी क्रमांक ५५) पाहता, सर्वप्रथम ही बाब निदर्शनास येते की तो कोणताही जप्ती पंचनामा नसून, तो फक्त अपघातग्रस्त वाहनांचा दिसणाऱ्या सद्यस्थितीनुसार करण्यात आलेला पंचनामा आहे. तो पंचनामा देखील दिनांक १०/०८/२०१६ रोजी पोलीस ठाण्यात करण्यात आल्याचे दिसून येते. परंतु, ती वाहने पोलीस ठाण्यात कधी आणली गेली आणि कोणाच्या ताब्यातून हस्तगत करण्यात आली, याबाबत कोणतीही माहिती न्यायालयाच्या पटलावर आल्याचे दिसून येत नाही.

**४८.** एक वेळ हा पंचनामा (निशाणी क्रमांक ५५) पुराव्यात वाचला असता, त्याद्वारे अपघातग्रस्त कथित वाहने एमएच ०४ सीजे ६४३४ व एमएच १७ एएफ १५३४ यांच्यावर अपघाताच्या खुणा आढळून आल्या असल्या तरी, त्या वाहनाचा आरोपीशी संबंध दर्शवणारा पुरावा देखील पटलावर आणणे तितकेच आवश्यक होते.

**४९.** यापूर्वीच विस्तृतपणे चर्चा केल्याप्रमाणे, सर्व साक्षीदारांनी जरी आरोपी वाहन चालवत असल्याचे सांगितले असले तरी, ती माहिती त्यांनी एकतर पोलिसांनी दिलेल्या माहितीच्या आधारे कथन केली आहे, किंवा इतर व्यक्तींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे कथन केली आहे. अशा परिस्थितीत, ते वाहन आरोपीच्या ताब्यात होते व आरोपीच ते वाहन चालवत होता, याबाबत सबळ पुरावा पटलावर येणे अपेक्षित होते. करिता, मी याबाबत अधिक माहिती स्पष्ट करणारा पुरावा सादर झाला आहे का, हे पाहण्यासाठी इतर पुरावा विचारात घेत आहे."

**५०.** अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्रमांक ५, वैद्यकीय अधिकारी डॉ. अक्षय धनराज पाटील यांनी आपली साक्ष निशाणी क्रमांक ४४ द्वारे नोंदवली आहे. न्यायालयाचे सूचनापत्र (समन्स) प्राप्त झाल्यानंतर ते साक्ष देण्यासाठी उपस्थित राहिले. त्यांनी सुरुवातीलाच हे स्पष्ट केले की, प्रस्तुत प्रकरणातील वैद्यकीय प्रमाणपत्रे त्यांनी स्वतः निर्गमित केलेली नाहीत. त्यांच्या पूर्वीचे तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. मौलिक वैश्य यांनी ती प्रमाणपत्रे निर्गमित केली असून, ते सध्या त्या रुग्णालयात कार्यरत नाहीत.

**५१.** साक्षीदार क्रमांक ५ हे दवाखान्यातर्फे एक अधिकृत व्यक्ती म्हणून न्यायालयासमक्ष साक्ष देत आहेत. त्याबाबत त्यांनी निशाणी क्रमांक ४५ वरील अधिकारपत्र न्यायालयाच्या पटलावर सादर केले आहे. त्यांनी न्यायालयासमक्ष सादर केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रांच्या आधारे, दिनांक ०५/०८/२०१६ रोजी रुग्णांच्या केलेल्या तपासणीबाबत माहिती दिली.

**५२.** निशाणी क्रमांक ४६ वरील प्रमाणपत्राच्या आधारे त्यांनी सांगितले की, रुग्णाचे स्नायू व त्वचा दुखापतग्रस्त होऊन फ्रॅक्चर झाले होते, तसेच त्वचा सोलून निघाली होती. ही दुखापत १५ x १५ आकाराची असून ती हाडाच्या खोलीपर्यंत गेल्याचे निदर्शनास आले. तसेच, डोक्याच्या मागील भागात कठीण व बोथट हत्याराने दुखापत झाल्याचे नमूद केले आहे. सदर दुखापत ही गंभीर स्वरूपाची आणि ताजी असल्याचे त्यांनी सांगितले.

**५३.** तसेच, सदर साक्षीदाराने निशाणी क्रमांक ४७ वरील वैद्यकीय प्रमाणपत्र पाहून सांगितले की, त्या प्रमाणपत्रानुसार दुसऱ्या रुग्णाच्या उजव्या पायाला २.१ सेंटीमीटर आकाराची जखम आढळून आली असून, ती दुखापत किरकोळ स्वरूपाची आहे.

**५४.** या दोन्ही वैद्यकीय प्रमाणपत्रांना सुरुवातीलाच पुराव्यात निशाणी देण्यास तत्कालीन पीठासीन अधिकाऱ्यांनीपरवानगी दिल्याचे दिसून येत नाही. त्या दोन्ही प्रमाणपत्रांना केवळ 'ओळख' म्हणून निशाणी क्रमांक दिल्याचे नमूद आहे. यामुळे, ही प्रमाणपत्रे कायदेशीररीत्या सिद्ध झाली आहेत का, ही बाब सर्वप्रथम ठरवावी लागेल.

**५५.** केवळ एखाद्या दस्तावर निशाणी दिली, याचा अर्थ तो दस्त कायदेशीररीत्या सिद्ध झाला, असे होत नाही. याबाबत कायद्यात कोणतीही शंका नसून, कायदेशीर तरतूद पूर्णतः स्पष्ट आहे. प्रस्तुत प्रकरणात, तत्कालीन पीठासीन

अधिकाऱ्यांनी ओळखीपुरती निशाणी दिल्याचे नमूद केले आहे. अशा परिस्थितीत, तो दस्त कायदेशीररीत्या सिद्ध झाला आहे, हे मान्य करता येणार नाही.

**५६.** हे दोन्ही दस्त वैद्यकीय प्रमाणपत्र म्हणून सादर करण्यात आले आहेत. ही दोन्ही प्रमाणपत्रे म्हणजे तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. मौलिक वैश्य यांचे एक 'तज्ज्ञ साक्षीदार' म्हणून दिलेले वैद्यकीय मत आहे. अशा परिस्थितीत, सदर वैद्यकीय मत हे त्या तज्ज्ञ साक्षीदाराच्या (ज्यांनी ते प्रमाणपत्र दिले त्यांच्या) प्रत्यक्ष पुराव्यातूनच सिद्ध होणे अपेक्षित होते. परंतु, तसे झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे, जर तज्ज्ञाचे मत केवळ त्यांनी लिखित स्वरूपात दिलेल्या दस्ताच्या आधारे (स्वतः साक्ष न देता) इतर व्यक्तीव्दारे न्यायालयात सादर केले जात असेल, तर तो केवळ एक 'ऐकीव पुरावा' म्हणूनच विचारात घ्यावा लागेल. प्रस्तुत प्रकरणात, साक्षीदार क्रमांक ५ हे दुसऱ्या डॉक्टरांनी लिहिलेली माहिती फक्त वाचून दाखवत आहेत, त्यामुळे ती माहिती ग्राह्य धरता येणार नाही.

**५७.** मी निशाणी क्रमांक ४५ वरील अधिकारपत्र वाचले असता, त्यात स्पष्टपणे नमूद आहे की, सदर साक्षीदारास रुग्णालयातील मूळ दस्तऐवज न्यायालयात सोबत आणून, त्या आधारे साक्ष देण्यासाठी प्राधिकृत केले होते. परंतु, साक्षीदार क्रमांक ५ यांचा पुरावा पाहता, त्यांनी स्वतः सोबत कोणताही मूळ दस्तऐवज आधारे साक्षदेण्याऐवजी, केवळ न्यायालयाच्या पटलावर अगोदरच दाखल असलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रांची पाहणी करून आपले मत व्यक्त केले आहे. त्यांनी स्वतः सोबत आणलेल्या

एखाद्या मूळ रेकॉर्डच्या आधारे ही माहिती सांगितली होती का, याबाबत त्यांच्या पुराव्यात कोणतेही स्पष्टीकरण दिसून येत नाही. केवळ याच कारणास्तव त्यांचा पुरावा अग्राह्य ठरत आहे.

**५८.** या प्रकरणात, तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. मौलिक वैश्य हे सध्या त्या दवाखान्यात नोकरीस नसले तरी, ते जिथे कार्यरत आहेत तेथून त्यांना न्यायालयासमोर हजर करणे अभियोग पक्षाला शक्य होते. मात्र, अभियोग पक्षाने तशी कोणतीही तसदी घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे, मूळ तज्ज्ञ डॉक्टरांऐवजी दुसऱ्याच एखाद्या डॉक्टरने फक्त दस्तातील माहिती वाचून दिलेली साक्ष हा 'तज्ज्ञ पुरावा' म्हणून पुराव्यात वाचणे शक्य नाही. परिणामी, या दोन्ही वैद्यकीय प्रमाणपत्रांना जरी ओळख म्हणून निशाणी देण्यात आली असली तरी, ती कायदेशीररीत्या सिद्ध न झाल्याने ती पुराव्यात वाचता येणार नाहीत.

**५९.** अभियोग पक्षाने तपासलेले साक्षीदार क्रमांक १०, तपासी अधिकारी सोमनाथ भगवान जायभाये यांनी आपली साक्ष निशाणी क्रमांक ६३ द्वारे नोंदवली आहे. त्यांनी कथन केले आहे की, सन २०१६ मध्ये ते लोणी पोलीस ठाण्यात पोलीस नाईक या पदावर कार्यरत असताना, गुन्हा क्रमांक ११०/२०१६ चा तपास तोंडी आदेशानुसार त्यांच्याकडे सोपविण्यात आला होता.

**६०.** त्यांनी घटनास्थळी जाऊन घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्रमांक २१) तयार केला आणि त्यासाठी पंचांना बोलावून त्यांच्या सह्या घेतल्या. अपघातग्रस्त 'बजाज

चॅम्पियन ४ एस' मोटरसायकल क्रमांक एमएच १७ एएफ १५३४ व इंडिका कार क्रमांक एमएच ०४ सीजे ६४३४ त्यांनी पोलीस ठाण्यात आणल्या आणि निशाणी क्रमांक २५ द्वारे या दोन्ही वाहनांचा जप्ती पंचनामा केला.

**६१.** त्यानंतर वाहनांची तांत्रिक तपासणी करून, निशाणी क्रमांक ६५ व ६६ च्या बंधपत्राद्वारे ती वाहने त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात दिली. त्यांनी अपघातग्रस्त वाहनांची छायाचित्रे काढून घेतली असून, ती छायाचित्रे निशानी 'अ' आणि 'ब' असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी जखमी व्यक्तींचे वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्रमांक ६७) प्राप्त करून घेतले. तसेच, साक्षीदारांचे पुरवणी जबाब नोंदवले, ज्यामध्ये आरोपीचे नाव तुषार खरडे असल्याचे त्यांना समजले. तपासाअंती, आरोपीनेच त्याची इंडिका कार निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवून मोटरसायकलला धडक दिल्याचे, आणि त्याद्वारे मोटरसायकलस्वारांना जखमी करून वाहनांचे नुकसान केल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांनी आरोपीला अटक केली. त्याबाबत त्यांनी अटक पंचनामा (निशाणी क्रमांक ६७) तयार केल्याचे सांगितले.

**६२.** सदर साक्षीदाराचा सरतपास पाहता, ते या प्रकरणातील तपासी अधिकारी असल्याने त्यांची साक्ष अत्यंत महत्त्वाची आहे. या प्रकरणात आतापर्यंत तपासलेल्या सर्व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी अपघाताबाबतची माहिती व आरोपीचे नाव हे केवळ इतर व्यक्तींकडून ऐकलेल्या माहितीच्या आधारे कथन केली आहे. एकाही साक्षीदाराने स्वतः आरोपीची ओळख पटवल्याचे किंवा त्याचे नाव स्पष्ट केल्याचे दिसून येत नाही. त्यांना ती

माहिती एकतर पोलिसांकडून किंवा इतर व्यक्तींकडून समजली होती. अशा परिस्थितीत, प्रस्तुत अपघाताशी आरोपीचा संबंध कसा प्रस्थापित झाला, हे सिद्ध करण्यासाठी तपासी अधिकाऱ्याची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरते.

**६३.** परंतु, तपासी अधिकाऱ्याचा पुरावा पाहता, आरोपीचे नाव साक्षीदारांच्या 'पुरवणी जबाबा'द्वारे समोर आल्याचे त्यांनी कथन केले आहे. यावरून त्यांनी स्वतः तपासादरम्यान कोणत्याही साक्षीदाराला आरोपीचे नाव सांगितले नसल्याचे दिसून येते. न्यायालयाच्या पटलावर आलेल्या एकंदरीत पुराव्यांवरून, आरोपीचे नाव नेमके कोणत्या साक्षीदाराच्या वैयक्तिक माहितीतून समोर आले, याबाबत साक्षीदाराने स्पष्ट होत नाही.

**६४.** सदर तपासी अधिकाऱ्याने त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, तपास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी घटनास्थळावरून दोन्ही अपघातग्रस्त वाहने जप्त केली व त्याबाबत जप्ती पंचनामा (निशाणी क्रमांक २५) तयार केला. परंतु, न्यायालयाच्या पटलावर 'निशाणी क्रमांक २५' असा कोणताही जप्ती पंचनामा दाखल असल्याचे दिसून येत नाही. मी दिनांक ०६/०३/२०१९ चा रोजनामा पडताळून पाहिला असता, त्या दिवशी जप्ती पंचनाम्याला निशाणी २५ देण्याऐवजी, आरोपीच्या गैरहजेरीच्या अर्जास निशाणी क्रमांक २५ दिल्याचे दिसून येते. तसेच, दिनांक २६/०९/२०२४ रोजी (ज्या दिवशी या साक्षीदाराची साक्ष नोंदवली गेली), त्या दिवशीचा रोजनामा पाहिला असता, त्यात कोणत्याही जप्ती पंचनाम्याला निशाणी दिल्याचे नमूद नाही.

**६५.** पटलावर निशाणी क्रमांक २५ चा कोणताही जप्ती पंचनामा उपलब्ध नसल्याने, साक्षीदाराने केलेले हे कथन 'निशाणी क्रमांक ५५' वरील जप्ती पंचनाम्यालाच उद्देशून असावे, ही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, ते कथन जप्ती पंचनामा (निशाणी क्रमांक ५५) बाबतच केले असावे, असे मी ग्राह्य धरतो.

**६६.** परंतु, यापूर्वीच चर्चा केल्याप्रमाणे, निशाणी ५५ हा 'जप्ती पंचनामा' नसून, तो दिनांक १०/०८/२०१६ रोजी पोलीस ठाण्यात वाहनांच्या केलेल्या परीक्षणावरून (सद्यस्थितीवरून) तयार केलेला पंचनामा आहे. म्हणजेच, ती अपघातग्रस्त वाहने घटनास्थळावरून पोलीस ठाण्यात कोणी आणि कशा पद्धतीने आणली, याबाबत न्यायालयाच्या पटलावर कोणतीही सलग व सुसंगत माहिती समोर आलेली नाही.

**६७.** अभियोग पक्षाच्या कथनानुसार ही घटना दिनांक ०५/०८/२०१६ रोजी घडली होती. मात्र, घटनेची फिर्याद तब्बल दोन दिवसांनी, म्हणजेच दिनांक ०७/०८/२०१६ रोजी देण्यात आली. त्यानंतरच तपासी अधिकाऱ्याकडे तोंडी आदेशाने या गुन्ह्याचा तपास आला असावा. अशा परिस्थितीत, दोन्ही वाहने तब्बल दोन दिवस घटनास्थळीच पडून होती का? याबाबत मोठी शंका निर्माण होते.

**६८.** जर तपासी अधिकाऱ्याने घटनास्थळावरून ती वाहने हस्तगत केली असती, तर त्याबाबत घटनास्थळीच जप्ती पंचनामा करणे त्यांना सहज शक्य होते. परंतु, घटनास्थळी अशी कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. याउलट, दिनांक ०७/०८/२०१६ रोजी झालेल्या 'घटनास्थळ पंचनाम्याची' कार्यवाही पाहिली असता,

घटनास्थळी कोणतेही वाहन मिळून आल्याचे त्यामध्ये नमूद नाही. यावरून, ती वाहने घटनास्थळावरून तपासी अधिकाऱ्याने किंवा इतर कोणत्या व्यक्तीने पोलीस ठाण्यात आणून लावली, याबाबत कोणताही पुरावा न्यायालयाच्या पटलावर उपलब्ध नाही. ही बाब वाहनांच्या जप्तीबाबत आणि वाहनांच्या क्रमांकाबाबत निश्चितच गंभीर शंका निर्माण करणारी ठरते.

**६९.** तपासी अधिकाऱ्यानेही आरोपीचे नाव केवळ पुरवणी जबाबावरून निष्पन्न झाल्याचे कथन केले आहे. यावरून, त्यांनी स्वतः तपासादरम्यान अशी कोणतीही स्वतंत्र माहिती हस्तगत करून कथित वाहनाशी आरोपीचा संबंध निश्चित केल्याचे दिसून येत नाही. वाहनांच्या तांत्रिक पडताळणीनंतर, निशाणी क्रमांक ६५ व ६६ च्या बंधपत्राद्वारे वाहने मूळ मालकांच्या ताब्यात दिल्याचे त्यांनी कथन केले आहे. परंतु, अपघातग्रस्त चारचाकी इंडिका कार एमएच ०४ सीजे ६४३४ ही आरोपीच्या ताब्यात न देता, निशाणी क्रमांक ६५ द्वारे 'शरद एकनाथ बेंद्रे' नावाच्या व्यक्तीच्या ताब्यात दिल्याचे न्यायालयाच्या पटलावरून दिसून येते. शरद बेंद्रे यांचा पोलिसात जबाब नोंदवल्याचा किंवा त्यांच्या मालकीचे वाहन घटनेच्या वेळी आरोपी चालवत होता, हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा किंवा त्यांची साक्ष अभियोग पक्षाने न्यायालयासमोर आणलेली नाही. यावरून, कथित वाहनाशी आरोपीचा संबंध प्रस्थापित करणारा पुरावा सादर करणे सहज शक्य असतानाही, अभियोग पक्षाने तो पुरावा न्यायालयासमोर सादर केला नसल्याचे स्पष्ट होते.

**७०.** करीता एकंदीत पटलावरील पुरावा पाहता, प्रस्तुत प्रकरण हे दिनांक ०५ ऑगस्ट २०१६ रोजी घडलेल्या एका रस्ते अपघातासंदर्भातील असून, यात आरोपी तुषार खरडे याने भरधाव इंडिका कार चालवून फिर्यादीच्या दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने दोघांना गंभीर दुखापत झाल्याचा व नुकसान केल्याचा आरोप होता. या प्रकरणात अभियोग पक्षाने एकूण १० साक्षीदार तपासले; मात्र, गुन्ह्याची फिर्याद दोन दिवसांनी उशिरा देणे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा अभाव आणि केवळ 'ऐकीव माहितीच्या' आधारे आरोपीची निष्पन्न केलेली ओळख यामुळे अभियोग पक्षाचा खटला अत्यंत कमकुवत ठरला.

**७१.** तसेच, वैद्यकीय प्रमाणपत्रे देणाऱ्या मूळ डॉक्टरांऐवजी दुसऱ्याच अधिकाऱ्याची साक्ष नोंदवणे, घटनास्थळ व वाहनांच्या जप्ती पंचनाम्यातील गंभीर त्रुटी आणि अपघातग्रस्त कारचा मूळ मालक दुसराच असताना त्या वाहनाशी अथवा अपघाताशी आरोपीचा थेट संबंध जोडणारा कोणताही ठोस पुरावा न्यायालयात सादर न करणे, या बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आल्या. परिणामी, घटनेच्या वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे आणि हयगयीने चालवून अपघात केला, त्याद्वारे तो वाहनांच्या नुकसानीस व जखमी व्यक्तींच्या दुखापतीस कारणीभूत ठरला, आणि अपघातानंतर पोलिसांना माहिती न देता तो घटनास्थळावरून पसार झाला, हे आरोप संशयातीतपणे सिद्ध झालेले नाहीत. करिता, मी **मुद्दा क्रमांक १ ते ६** चे उत्तर '**नकारार्थी**' नोंदवले आहे. तसेच, **मुद्दा क्रमांक ७** च्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करत आहे:

## <u>आदेश</u>

१. **आरोपी तुषार विलास खर्डे** याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४ (अ)(ब), १८७ सह कलम १७७ या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे प्रस्तूत प्रकरणात हजर राहण्यासाठी देण्यात आलेले जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. परंतु आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ नुसार दिलेली जामीनपत्र व बंधपत्र सहा महिने कालावधीपर्यंत कायम राहील.

(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

SANTOSH RAMAKANT BHARAD
Digitally signed by SANTOSH RAMAKANT BHARAD
Date: 2026.05.25 16:19:57 +0530

दिनांकः २५/०५/२०२६
ठिकाण : राहाता

(संतोष र. भरड)
**न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग,**
(न्यायालय क्र.२) राहाता.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्द न् शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव - एस. डी. कापसे.

कार्यालयाचे नाव - दिवाणी व फौजदारी न्यायालय, राहाता.

स्वाक्षरीत/-

लघुलेखक